| MHKO110009832016 | **नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०१६**<br>**आदेश निशाणी क्रमांक ९२**<br>**(श्री.सुरेंद्र धोंडीराम शिंदे वगैरे विरुध्द श्री.तुकाराम दादु गुरव )** |
|---|---|

वादी क्रमांक २ तर्फे वारस यांनी प्रस्तुतचा अर्ज हा मयत वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणणेस झालेला २ महीने १९ दिवसांचा विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. **(प्रस्तुत कामी यापुढे त्यास वादी म्हणून संबोधण्यात येईल )**

**२.** वादी क्रमांक २ तर्फे वारस यांचे कथन असे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता दावा दाखल केलेला आहे. दरम्यान वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे दिनांक ०८.०४.२०२४ रोजी निधन झालेले आहे. वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता २ महीने १९ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादीतर्फे वारस यांनी वादी क्रमांक २ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. तसेच प्रस्तुत वादी यांना कायदयाचे ज्ञान नसलेने. प्रस्तुत कामी विलंब अर्ज दाखल करणेस विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादीतर्फे वारस यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून वादी यांना विनाकारण न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे.

३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे निशाणी ९४ वर दाखल करुन अर्जातील कथनांचा इन्कार केलेला आहे. त्यांच्या मते वादी यांनी दिलेल्या अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये विलंबाचे कोणतेही कारण नमूद नाही. वादी यांनी वादी क्रमांक २ चे वारस हे दिनांक ०७/०७/२०२४ पर्यंत रेकॉर्डवर आणणे जरुरीचे होते. परंतू ते त्यांनी जाणुनबुजून दिनांक २७/०९/२०२४ पर्यंत रेकॉर्डवर आणणेचे टाळले आहे. यावरुन वादी यांचा निष्काळजीपणा

व हलगर्जीपणा दिसून येतो. वास्तविक वादी यांना वादी क्रमांक २ यांचा मृत्यूदाखला दिनांक १४/०५/२०२४ रोजी मिळाला आहे हे त्यांनी निशाणी ९० वरील मृत्यूदाखल्यावरुन स्पष्ट होते. यावरुन वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेकरीता २ महीने २१ दिवसांचा जाणुनबुजून विलंब केला असून त्याकरीता त्यांचेकडे कोणतेही संयुक्त कारण नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. तसेच यदाकदाचित प्रस्तुत अर्ज मंजूर करणेचे निर्णयाप्रत मे.कोर्ट आल्यास वादीकडून प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५०००/- (रक्कम रुपये पाच हजार फक्त) देणेत यावे अशी विनंती केली आहे.

**४.** वादीतर्फे वारस यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे. कायदयातील प्रस्थापित तरतूदीनुसार विलंबासाठी दिलेले कारण संयुक्तीक दिसत असेल, तर विलंब माफ करणेची तरतूद आहे. प्रस्तुत अर्जामध्ये विलंबाचे कारण जरी नमूद नसले तरीदेखिल दाव्याचे स्वरुप पाहता दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेकरीता मयत वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी वादी क्रमांक २ यांचे कायदेशीर प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. परंतू वादी यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसवणे योग्य व संयुक्तीक वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

**१.** अर्ज (निशाणी क्र. ९२) प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशे फक्त) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमुद वादी यांचे वारसाबाबत दाव्यात दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व वादपत्राची दुरुस्त प्रत दाखल करावी.

Sd/-
(श्रीमती एस.जे.पेंडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.पेठवडगांव

ठिकाण – पेठवडगांव
दिनांक- १३/१२/२०२४